

# KALEIDOSCOPE






अल्फिया बेग नम्रता घाडी आकांक्षा टक्के अजयकुमार सिंह नरेश ताम्हणकर

## भोसले फार्मसी कॉलेजचे 'नायपर' परीक्षेमध्ये यश

सावंतवाडी, ता. ५ : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च या संस्थांमधील पदव्युत्तर प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नायपर-२०२३ या राष्ट्रीय परीक्षेत येथील यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले. कॉलेजच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी ऑल इंडिया रँकिंगमध्ये स्थान मिळविले आहे. यात अल्फिया बेग (३३८), नम्रता घाडी (९५२), आकांक्षा टक्के (२१०६), अजयकुमार सिंह (२६०८) व नरेश ताम्हणकर (२६७७) यांचा समावेश आहे.

औषधनिर्माण क्षेत्रात उच्च गुणवत्ताधारक संशोधक व शास्त्रज्ञ तयार व्हावेत, यासाठी केंद्रातर्फे नायपर संस्था चालविल्या जातात. या संस्थांना स्वायत्त दर्जा असून, त्या अनुक्रमे मोहाली, अहमदाबाद, हाजीपूर, हैदराबाद, कोलकाता, गुवाहाटी व रायबरेली या ठिकाणी आहेत. येथे फार्मसीमधील एम.एस., एम.बी.ए., एम.टेक. व पीएचडी हे अभ्यासक्रम चालविले जातात. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देखील देण्यात येते. भोसले फार्मसीने कामगिरीत सातत्य राखत गेली पाच वर्षे या परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे. या परीक्षेच्या सरावासाठी कॉलेजने स्वतंत्र मार्गदर्शन तासिका आयोजित केल्या होत्या. विशेष तासिका, परीक्षा अभ्यासाचे नियोजन व विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हे यश मिळाल्याचे प्राचार्य डॉ. विजय जगताप यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष अच्युत सावंत-भोसले, प्राचार्य डॉ. विजय जगताप व परीक्षा समन्वयक डॉ. प्रशांत माळी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



# 'नायपर २०२३' राष्ट्रीय परीक्षेत भोसले फार्मसी कॉलेजचे यश

आल्फिया बेग नम्रता घाडी आकांक्षा टक्के अजयकुमार सिंह

नरेश ताम्हणकर

प्रतिनिधी
सावंतवाडी

नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲन्ड रिसर्च या संस्थांमधील पदव्युत्तर प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या 'नायपर-२०२३' या राष्ट्रीय परीक्षेत येथील यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले. कॉलेजच्या एकूण ५ विद्यार्थ्यांनी ऑल इंडिया रॅंकिंगमध्ये स्थान मिळविले आहे. यात अल्फिया समीर बेग (३३८), नम्रता मंगेश घाडी (९५२), आकांक्षा गजानन टक्के (२१०६), अजयकुमार सूर्यनारायण सिंह (२६०८) व नरेश बजरंग ताम्हणकर (२६७७) यांचा समावेश आहे.

औषधनिर्माण क्षेत्रात उच्च गुणवत्ताधारक संशोधक व शास्त्रज्ञ तयार व्हावेत, यासाठी केंद्र शासनाच्यावतीने 'नायपर' संस्था चालविल्या जातात. या संस्थाना स्वायत्त दर्जा असून त्या अनुक्रमे मोहाली, अहमदाबाद, हाजीपूर, हैदराबाद, कोलकाता, गुवाहाटी व रायबरेली या ठिकाणी आहेत. येथे फार्मसीमधील एम. एस., एम. बी. ए., एम. टेक. व पीएचडी हे अभ्यासक्रम चालविले जातात. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीदेखील देण्यात येते. यशवंतराव भोसले कॉलेज ऑफ फार्मसीने आपल्या कामगिरीत सातत्य राखत गेली पाच वर्षे नायपर परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे.

या परीक्षेच्या सरावासाठी कॉलेजने स्वतंत्र मार्गदर्शन तासिका आयोजित केल्या होत्या. विशेष तासिका, परीक्षा अभ्यासाचे नियोजन व विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हे यश मिळाल्याचे कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजय जगताप यांनी सांगितले.

## NATIONAL LEVEL NIPER - 2023 JOINT ENTRANCE EXAM QUALIFIERS, DATE OF RESULT: 24TH JULY 2023

| Sr. No. | Name of Student | All India Rank |
|---|---|---|
| 1 | Baig Alfia Sameer | 338 |
| 2 | Ghadi Namrata Mangesh | 952 |
| 3 | Takke Akanksha Gajanan | 2106 |
| 4 | Singh Ajaykumar Suryanarayan | 2608 |
| 5 | Tamhankar Naresh Bajrang | 2677 |

**Report Prepared & Approved By:**

**Dr. Prashant Y. Mali**
**ASPIRE Club - Coordinator**

**Dr. Vijay A. Jagtap**
**Principal**